DAY — **23** SEAT NUMBER | | | | | | |

2025	III	12	1500	**J-398**	(M)

HEALTHCARE – GENERAL DUTY ASSISTANT (G5)

Time : 3 Hrs. **(4 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*
(२) योग्य त्या ठिकाणी सुबक आणि नामनिर्देशित आकृती काढा.
(३) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.
(४) सर्व प्रश्नांच्या उत्तरांचा प्रारंभ नवीन पानांवर करावा.

प्र. १. **(अ)** रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहून विधाने पूर्ण करा व वाक्ये पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) व्यायाम हा एक ..... क्रियाकलाप आहे.
(अ) मानसिक (ब) शारीरिक
(क) सामाजिक

(२) भारतामध्ये 'जैव वैद्यकीय कचरा नियम' सन ..... या वर्षी लागू करण्यात आला.
(अ) १९८८ (ब) १९९८
(क) १९७७

(३) कोरोना हा रोग ..... मुळे होतो.
(अ) जिवाणू (ब) बुरशी
(क) विषाणू

(४) अँटीव्हायरस सॉफ्टवेअर ..... अपडेट करावे.
(अ) नियमित (ब) महिन्याने
(क) वर्षाने

(५) संगणकाचा शोध ..... यांनी लावला.

(अ) न्यूटन (ब) अलेक्झांडर फ्लेमिंग

(क) चार्ल्स बॅबेज

(ब) खालील 'अ' व 'ब' गटांतील शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा : (५)

'अ' गट	'ब' गट
(अ) हृदयामध्ये	(१) नाकाने
(ब) Housekeeping	(२) गंभीर समस्या
(क) Output device	(३) मॉनिटर (Monitor)
(ड) बेरोजगारी	(४) इंट्राकार्डियाक
(इ) नाकाद्वारे	(५) स्वच्छता

(क) खालील विधाने 'बरोबर' आहेत की 'चूक' ते लिहा : (५)

(१) कालबाह्य (expired) औषधे रुग्णांना देतात.

(२) लेझर थेरपीने स्नायू वेदना कमी करण्यास मदत होते.

(३) OPD हे २४ तास सुरू असते.

(४) Nosocomial infection हे रुग्ण रुग्णालयात भरती झाल्यावर होते.

(५) स्पायना बायफिडा मेंदूची व मणक्याची विकृती निर्माण करते.

(ड) खालील प्रश्नांची प्रत्येकी फक्त 'एका' वाक्यात उत्तरे लिहा : (५)

(१) औषधी वितरणामध्ये SOSचा अर्थ काय आहे?

(२) POMR चे पूर्ण रूप लिहा.

(३) मानवाच्या मूलभूत गरजा लिहा.

(४) शाश्वत विकासाचे तीन घटक कोणते?

(५) अँटीव्हायरस सॉफ्टवेअरची नावे लिहा.

प्र. २. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही चार) : **[१२]**

(१) दस्ताऐवजाची तत्त्वे लिहा.

(२) हायड्रोथेरपी वर टीप लिहा.

(३) रोग परिस्थिती विज्ञानाचा त्रिकोण लिहा.

(४) प्रभावी सक्रिय श्रवणाचे कौशल्य लिहा.

(५) उद्योजकाची भूमिका आणि कर्तव्ये लिहा.

(६) जागतिक आरोग्य (WHO) संघटनेने केलेले रुग्णालयीन कचऱ्याचे वर्गीकरण करा.

प्र. ३. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही चार) : **[१२]**

(१) तोंडावाटे औषधे देण्याचे फायदे लिहा.

(२) जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापनामध्ये मेट्रन / परिचारिकांची भूमिका लिहा.

(३) ताण-तणावाची लक्षणे लिहा.

(४) उद्योजकतेमध्ये येणारे अडथळे लिहा.

(५) संवादाचे प्रकार लिहा.

(६) लसीकरणाचे दुष्परिणाम लिहा.

प्र. ४. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) हस्तांतरण आणि डिस्चार्ज नोट्स लिहा.

(२) जैव वैद्यकीय कचरा श्रेणीबद्दल सविस्तर लिहा.

(३) रुग्णालयामध्ये कोण-कोणते कर्मचारी असतात?

(४) तणाव व्यवस्थापन करण्यासाठी व्यक्तीने कोणती कौशल्ये विकसित करायला पाहिजे?

(५) COPDचे पूर्ण रूप लिहा.

प्र. ५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) फरक स्पष्ट करा – सक्रिय व निष्क्रिय प्रतिकारशक्ती.

(२) शरीर यंत्रणेचा वापर कोणत्या गोष्टी टाळण्यासाठी केला जातो?

(३) शारीरिक मूल्यांकनाची तंत्रे लिहा.

(४) प्रेझेंटेशनसाठी स्लाइड कसे तयार कराल?

(५) सूक्ष्मजीवांचे प्रकार लिहा.

प्र. ६. **(अ)** खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा (कोणताही एक) : (६) **[१२]**

(१) GDAचे गुणधर्म लिहा.

(२) हात धुण्याच्या विविध चरणांबद्दल लिहा.

(ब) खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा (कोणताही एक): (६)

(१) शारीरिक कार्य करण्यासाठी कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्या?

(२) तक्ता पूर्ण करा :

अ.क्र.	लस	प्रतिबंधक
(१)	T.T.	_____
(२)	OPV	_____
(३)	BCG	_____
(४)	DPT	_____
(५)	DT	_____
(६)	Covishield	_____

◆◆◆